नि.दि.दावा क्र.६३/२०२२
प्रतिक वि. कारभारी व इतर.
CNR No.MHJN090002782022

## नि.क्र.१२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द ''जबाब नाहीचा'' झालेला आदेश रद्द करणेबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी सदर अर्जाच्या पाठीमागे स्वतःचे म्हणणे दाखल केलेले आहे.

२. अर्ज वाचला. दोन्ही पक्षकारांच्या म्हणण्याचे अवलोकन केले.

३. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, त्यांना आवश्यक ती कागदपत्रे न सापडल्यामुळे ते मुदतीच्या आत त्यांचा जबाब सादर करु शकले नाहीत. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे मालक व ताबेदार असल्यामुळे त्यांची कैफियत दावे कामी समाविषट करुन घेणेत यावी अशी विनंती करुन त्यांनी त्यांचेविरुध्द ''जबाब नाहीचा'' झालेला आदेश रद्द करुन लेखी जबाब स्विकारण्याची विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

४. वादींनी त्याचे म्हणणे दाखल करून प्रतिवादींचा अर्ज मुदतीच्या कायद्यास्तव नामंजूर करण्याची विनंती केलेली असून मंजूर केल्यास रक्कम रुपये २०००/– चा खर्च लावावा असे ही वादीनी नमूद केलेले आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.६ हिला दावेचे समन्स दि.०६.०६.२०२२ रोजी लागू झालेचे दिसून येतात. याप्रमाणे दि.४/९/२०२२ रोजी कैफियत दाखल करण्याकरिता आवश्यक असणारे ९०

दिवस संपुष्ठात आले आहेत व प्रतिवादीच्या अर्जास १७ दिवसांचा विलंब झाला असल्याचे दिसून येते. वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमण काढून कब्जाकरिता दाखल केला असल्याने प्रतिवादीला बचावाची संधी मिळणे जरुराचे आहे. प्रतिवादींचा लेखी जबाब स्विकारल्यास त्याचा प्रकरणाच्या गुणतत्वार कोणताही परिणाम होणार नाही. अर्जास झालेला विलंब हा किरकोळ विलंब असल्यामुळे अर्ज खर्चाशिवाय मंजूर करणे योग्य होईल. सबब, हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

अर्ज खर्चाशिवाय मंजूर करण्यात आला.

स्वाक्षरीत/–

दि.२१.११.२०२२

(श्रीमती.यु.पी.कोळी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.